९

# मुघल काळातील शहरीकरण

दवणे सिद्धार्थ राघो
सहाय्यक प्राध्यापक (इतिहास), के. डी. कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स,
विठ्ठलवाडी, कल्याण

मानवी संस्कृती ही जवळपास पाच लाख वर्षापासून अस्तित्वात आहे असे मानले जाते. जिंवत राहण्यासाठी मानवाला पहिल्यापासूनच निसर्गाशी झगडावे लागले. या धडपडीतूनच संस्कृति आणि विज्ञानाचा उदय झाला. प्रांरभिच्या काळातील मानवी जिवन हे ग्रामीण संस्कृतीवर आधारलेले होते पण नंतरच्या काळात हे जीवन शहरी संस्कृतीमध्ये परिवर्तित झाले.

भारतातील पहिली शहरी संस्कृती म्हणजे हडप्पा संस्कृती होय. ज्यात अनेक महत्त्वाच्या शहरांचा उदय व विकास झाला. उदा हडप्पा, मोहनजदडो, कालिबंगा, धोलिवारा, लोथल इ. परंतू पुढे विविध कारणांनी ही संस्कृती लोप पावली. भारतात दुसरे शहरीकरण हे ई.स.पूर्व ६ व्या शतकात झाले व ही प्रक्रिया गुप्त कालखंडापर्यंत सुरू होती. परंतू इ.स. ६ ते १० व्या शतकात शहरांची (नगर) संख्या कमी होत गेली. त्या साठी अनेक कारणे कारणीभूत होती. यात केंन्द्रीत सत्तेचा अभाव, व्यापार व वाणिज्याचे झालेले पतन व कृषी व्यवस्थेतील परंपरागत व्यवस्था इ. परत तुर्क सत्तेच्या स्थापने नंतर शहरीकरणाच्या प्रक्रियेला वेग आला. मोहम्मद हवीब यांच्या मते, दिल्लीत तुर्की सत्तेच्या स्थापनेमुळे एक नविन आर्थिक व्यवस्थेचा उदय झाला या व्यवस्थेलाच त्यांनी शहरी क्रांती असे संबोधले.

मुगल काळातील शहरीकरण हे सल्तनत काळातील शहरीकरणापेक्षा पूर्णत:वेगळे होते. मुगल काळात अनेक जुन्या शहरांचा विस्तार होत शहरी केंन्द्र विकसित होत गेली. उदा: गुजरात, फत्तेपूर, सिक्री, अलाहावाद, वाराणसी व फरीदाबाद ही सर्व प्रक्रिया अकबरच्या काळापासून सुरू होऊन १८ व्या शतकापर्यंत चालू होती. मुघल साम्राज्यातील छोटे शहर हे स्थानिक लोकांच्या गरजा पूर्ण करत होते. तर मोठी शहर ही आंतरराष्ट्रीय दर्जाचे बनले होते. या शहरामधून दक्षिणपूर्व आशिया, मध्यपूर्व आशिया व पश्चिम यूरोप सोबत व्यापार होत असे. या शहरामधील कारागिर व उत्पादन व्यवस्था, विकसित बाजार व्यवस्था, स्थल व समूद्रमार्गा ंनी शहरांना जोडणारी एक निश्चित दळणवळण व्यवस्था, शहरांतील समृद्धी व संपत्तीमूळे अनेक यूरोपियन प्रभावित झाले होते. ज्याचा उल्लेख त्यांनी आपल्या प्रवास वर्णनांत केला आहे.

मुघल साम्राज्यातील शहरांना चार भागात विभागता येईल १) प्रशासिकय शहरे, २) व्यापारी शहरे ३) धार्मिक शहरे ४) लष्करी शहरे

१) प्रशासकिय शहरे : यामध्ये प्रामुख्याने अशी शहरे होती. जी प्रशासकीय दृष्टीकोनातून महत्त्वाची असत व त्यात धर्माचा आधार हा गौण होता दिल्ली, आगरा, लाहोर तसेच वेगवेगळल्या सुब्यांच्या (छोटी शहर) राजधान्या या वर्गात मोडत असे. पुढील काळात पुणे, हैद्रावाद, फैजाबाद ही शहरे प्रशासकिय शहरे म्हणून उभी राहिली.

२) व्यापारी शहरे : यामध्ये असे शहर ज्यांमध्ये व्यापार मोठया प्रमाणावर चालत असे. त्याचप्रमाणे ही शहरे एका विशिष्ट वस्तूच्या उत्पादनांसाठी ओळखली जात.

उदा: गुजरात मधील पाटन रंग कामासाठी, आयोध्यान मधील खैराबाद सूती कापडांसाठी, आग्रा मधील बयाना नीळ साठी.



Vol: 3rd, Issue : II, English-Marathi, Quarterly: 1st SEP. 2014,ISSN : 2319-5525

३) धार्मिक शहरे : मुघल साम्राज्यातील अनेक प्रमुख तिर्थस्थान असलेली शहरे या वर्गात होती . अशा शहरांत तिर्थयात्रेकरूंची संख्या फार मोठी असे .
उदा : वाराणसी, मथूरा, कांची , तिरूमलाई इ . शहरे त्याचप्रमाणे अजमेर हे धार्मिक शहराबरोबरच एक प्रमुख प्रशासकिय केंन्द्र होते .
४) लष्करी शहर : यामध्ये लष्करी व भौगोलिक दृष्टीकोनातून महत्त्वाची अशी शहरे होती . ज्यामधील लोकसंख्या ही प्रामुख्याने सैनिकी वर्गाशी संबधित होती पण पुढील काळात अनेक गैर सैनिक वर्ग सुद्धा अशां शहरात राहू लागल . उदा : अटक व असीरगढ .

मुघलकाळात शहरांचा आकार व विस्तार हा तेथिल असलेल्या लोकसंख्ये वर अवलंबून होता . वेगवेगळया कारणांनी या शहारांचा विस्तार होत गेला . शेतीसाठी वापरत असलेल्या नविन तंत्रज्ञानामुळे शहरीकरण वाढत गेले प्रशासकीय क्षेत्रात झालेले नविन बदल एकच साम्राज्य व मुघल काळातील शांतता व सुव्यवस्था यामुळे सुद्धा शहरांची संख्या वाढत गेली . निरनिराळे स्थापित झालेले नविन उद्योगधंदे व नविन व्यापारी वर्गाचा झालेला उदय यामधून खेडी व छोटी शहरे ही मोठी शहरे बनत गेली परिणामी ग्रामीण वर्ग हा शहरी वर्गात परिवर्तित होत गेली .

मुघल काळातील बुहतेक शहर ही तरबंदी होती ज्याला एक किंवा त्यापेक्षा अधिक प्रवेशद्वारा असत . शहरातील लोकसंख्या हया तरबंदींच्या आत राहत शहरांची लोकसंख्या वाढत गेल्याने दिल्ली, आगरा, पटना, अहमदाबाद, इलाहाबाद इ . शहरांच्या बाहेर लोक तरबदीच्या लोकसंख्या वाढत  बाहेर राहू लागली त्यामुळे अनेक उपशहर बनत गेली . मुघल काळातील काही शहरे सुनियोजित होती . या काळातील सर्वच शहरांचे खास वैशिष्ट्ये म्हणजे तेथे असलेली बाजार किंवा (मंडी) व सराएच अस्तित्व .

मुघल काळात एका शहरात एका पेक्षा अधिक बाजार असत काही बाजार तिथे असलेल्या एखाद्या विशिष्ट वस्तूंच्या नावाने ओळखला जात . उदा . : आगरा येथिल लोहा गल्ली (लोखंडाच्या वस्तूचे ठिकाण), सावण कटरा (सावणांचा बाजार), निळ पाडा (निळ बाजार), नील पाडा (निळ वाडा), दिल्लीमधील जौहरी बाजार (दागिन्यांसाठी) दिल्लीमधील पहाडगंज येथे धाण्यांच्या रोख बाजार चाले . तसेच शहरात व्यापार करणारे लोक समुहाने जिथे राहत त्याला ते उत्पादित करीत असलेल्या उत्पादनाच्या नावाने किंवा एखादया श्रीमंत व्यापाराच्या नावाने त्या भागाला ओळखले जात उदा . : कुजंडो मुहल्ला (भाजी विकणारा वर्ग) मोची (बूट बनविणारा) मुहल्ला जरगरान (सोनाराचा वर्ग), कुचा रंगरेजन (कपडे रंगवणारे)इ .
मुघल काळातील शहरांचे दुसरे वैशिष्टये म्हणजे प्रत्येक शहरात सराए च असण . व्यापारी व यात्रेकरूसाठी राहण्याचे असलेले ठिकाण हे सराए म्हणून ओळखले जात येथे व्यापाऱ्यांना आपले सामान ठेवण्याबरोबर आराम करण्याची सुद्धा सोयी होत्या . राज्यातील श्रीमंत व्यापारी राजराण्यातील स्त्रिया यांच्याद्वारे शहरात सराए बांधले जात . दिल्ली, आग्रा, पटना , लाहौर, अहमदाबाद इ . शहरामध्ये अनेक सराए बांधली गेली होती .

मुघलकाळात शहरात राहणारी लोकसंख्या किती होती . हे निश्चितपणे सांगता येणार नाही . तबकातएअकबरीच्या मते अकबरच्या काळात भारतात १२0 मोठे शहरे व ३000 कस्बे (छोटी शहरे) अस्तित्वात होती ज्यामध्ये दक्षिण भारतातील छोटयामोठया शहरांचा समावेश नव्हता . १७ व्या शतकात उद्योगधंदे व व्यापारात झालेल्या वाढीमुळे निश्चितपणे शहरी लोकसंख्या सुद्धा वाढली असेल . १७ व्या शतकात मुघल साम्राज्यातील सर्वात मोठे शहर आगरा होते ज्याची लोकसंख्या जवळपास ५00000 होती . इरफान हबीब यांच्या मते एकूण लोकसंख्येच्या १५% लोकसंख्या ही शहरात राहत असे इरफान हबीब यांनी त्याकाळातील लोकसंख्या ही पुढीलप्रमाणे सांगितली आहे .



Vol: 3rd , Issue : II, English-Marathi, Quarterly: 1st SEP. 2014,ISSN : 2319-5525

| वर्ष | शहर | लोकसंख्या |
|---|---|---|
| १६०९ | आग्रा | ५००००० |
| १६२९–४३ | | ६६६००० |
| १६६६ | | ८००००० |
| १६५९–६६ | दिल्ली | ५००००० |
| १५८१ | लाहौर | ४००००० |
| १६१५ | | ७००००० |
| १६१३ | अहमदाबाद | १००००० |
| १६६३ | सुरत | १००००० |
| १६०० | | २००००० |
| १६३१ | पटना | २००००० |
| १६३० | ढाका | २००००० |

स्रोतइरफान हबीब, कैम्ब्रिज इकोनॉमिक हिस्ट्री आफ इंडिया, खंड १, पृष्ठ क्र १७१)

मुघल काळातील शहरीकरण हे वेगवेगळया कारणांनी फार महत्त्वाचे आहे. सल्तनत काळातील शहारांचा मुघल काळात विस्तार होत गेला. त्याचप्रमाणे अनेक नविन शहरे अस्तित्वात आली. या शहरीकरणात व्यापारउद्योगधंद्याची भूमिका फार महत्त्वाची होती. ज्यामुळे लोकांचे राहणीमान उंचावले. मुघल शहरांचे एक खास वैशिष्टये म्हणजे शहरातील बहुसंख्य लोकांचे जीवन हे शेतीवर आधारित उद्योगधंद्यावर अवलंबून नव्हते. खरे तर शहरीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे. ज्यात एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील ग्रामीण स्वरूप हे हळूहळू लुप्त होत जाते. तेथील राहणारी बहुसंख्य लोकसंख्याचे जीवन हे शेतीवर अवलंबून नसते. आपल्या रोजच्या दैनंदिन जीवनावश्यक वस्तू ते विकत घेवू लागतात. असेच चित्र आपल्याला मुघल काळातील शहरात दिसून येते.

संदर्भ ग्रंथ

१) इरफान हबीब (संपादक): मध्यकालीन भारत
२) हरिश्चंद्र वर्मा (संपादक): मध्यकालीन भारत (१५४०१७०१) भाग२
३) सतीश चंद्र: मध्यकालीन भारत (१५२६१७०१)
४) नीरज श्रीवास्तव: मध्यकालीन भारत प्रशासन समाज एंव संस्कृतिक